# धुरे आणि कुंपणे नसलेल्या साकल्याची कविता

१. बंधो!
प्रश्न माणसांना जिवंत करतात.
माणसांच्या जिवंतपणाला
प्रश्नांमुळे येतात नवनवे धुमारे
आणि हे जिवंतपण
गगनाच्या पारंब्या धरून
चढत जाते सरसर वर.
माणसाच्या देहात मावत नाही
या जिवंतपणाचा विस्तार.
हे जिवंतपण ठेवते
नवनवी अंतरिक्षे
माणसाच्या मनापुढे
आणि या मनातील
आकांक्षांपुढे.
कुठलाही शेवट नसतो
या जिवंतपणाच्या
महाकाव्याला.
मानवी जीवनाचे महाकाव्य
असे अंतहीन
काळासारखे!

२. बंधो!
प्रश्नांचा हात धरून,
प्रश्नांचे सूर्य हातात घेऊन
माणूस निघतो
प्रकाशाचे नवनवे प्रदेश
पालथे करीत.
हा त्याचा प्रवास असतो
नव्या प्रकाशाकडून
अधिक नव्या प्रकाशाकडे.
त्याला व्हायचे असते
प्रकाशमान सूर्यापेक्षाही.
कधी उगवलाच नाही सूर्य
तर त्याच्या बदलीवर
आपल्याला उगवता यावे
यासाठी तो वाढवतो आहे
सतत स्वतःची प्रकाशशक्ती.
माणूस त्याने निर्माण केलेल्या
शक्यतांमध्ये नाही मावत कधीच.
म्हणून तो निर्माण करतो सतत
नवनव्या शक्यता.
माणसाची लढाई अशी
अशक्यतांवर मात करण्यासाठी,
त्यासाठी तो स्वतःही
सतत स्वतःवर मात करीत
उडतो.
हा त्याचा शोध
त्याच्याच डोक्याच्या अथांगतेचा
शोध असतो.

३. बंधो!
ज्यांच्या मनात प्रश्न उगवत नाही
त्यांची मने कोमेजत जातात.
ज्यांच्या मनात
प्रश्नांचे युद्ध सुरू असत नाही
त्यांची मने ओसाड होऊन जातात.
प्रश्न निर्माण होणे
कसे अनैतिक आहे
हे ज्यांना शिकविले जाते
ते नैतिक प्रश्नांच्या

वाटेला जात नाहीत.
प्रश्न निर्माण होणारे मन
घेत असते शंका.
हस्तक्षेप करीत असते
आणि ही शंका व्यवस्थेसंबंधीची
असते.
हा हस्तक्षेप विद्यमान
समाजरचनेसंबंधी असतो.
या समाजरचनेच्या लाभार्थ्यांसंबंधी
असतो.
आणि हे लाभार्थी
प्रश्नांची करीत असतात नाकेबंदी.
ते करीत असतात शंकांचे उगम बंद,
ते बंद करतात
शंका येऊ शकणाऱ्या मनांचे उत्पादन.

४. बंधो!
वाहून चालले आहे गाव
पुरात आणि
गावातील माणसे
झोपेच्याच अथांग नशेत.
पूर स्वप्नातला नसल्याने
झोपेतही दिसत नाही तो
माणसांना!
झोपेला दिसत नसतो पूर
अंधाराला दिसत नाही
अंधार.
जोर चढतो आहे पुराचा,
गावाला वाटते
आपल्याला झुलवले जात आहे
पाळण्यात.
पूर गावाला कुठे घेऊन जाईल
कोणत्याच झोपेला माहीत नाही.
मृत्यूचा विकराल जबडा
झोपेला दिसत नाही.
गाव वाहून चालले आहे
आणि प्रतिकाराचे कुठे
चिन्ह नाही.

५. बंधो!
विजांच्या डोंगरांना
काही सांगायचे आहे
आणि माहोल
मनःस्थितीत नाही
ऐकण्याच्या.
वस्त्यांमधून फिरताहेत
उषःकाल घेऊन डोंगर
आणि स्वागताला
एखादेही अंगण पुढे येत नाही.
वस्त्यांची घुसमट
मावत नाही वस्त्यांमध्ये.
घुसमटीचे काळे ढग
ओथंबून आले आहेत
वस्त्यांवर
आणि पाऊस नाही.
वातावरणाला गेले आहेत
आरपार तडे.
मनांमधील भेगा होत आहेत
दिवसेंदिवस मोठ्या.
वाळवंटाला वाटते
आपण जळून जाऊ बेचैनीत.
अंधारातून फुत्कारत येणाऱ्या वाऱ्याची
भीती वाटते
लहानमोठ्या स्वप्नांना.
तोंडांच्या गटारांमधून
येणाऱ्या अतिरेकी दुर्गंधीची
भीती वाटते श्वासांना.
बेटे घाबरली नाहीत

पण मृत्यूंचा सागर
गिळू पाहतो आहे त्यांना...

६. बंधो!
या हलाहलाच्या नद्यांना
किनारेच नाहीत.
वस्त्यांमधून फिरणारे तलवारीचे
अतिरेकी जमाव.
भयभीत वस्त्या करीत आहेत
असत्यांचा जयजयकार.
आजारी तोंडांचा संसर्ग
होतो आहे सौहार्दाला.
काळेकुट्ट ढग दाटून आले आहेत
माथ्यावर.
जमिनीने आता घट्ट असावे
तिने निसर्गातून उगवायला हवे
पहाटेसारखे
आणि झेलून घ्यावेत ढग
तिने आपल्या कुशीत
आणि सुरुवात करावी जीवनाची
नवनव्याने.

७. बंधो!
आपण माणसे आहोत.
आपण मातीतून उगवलो
झाडांसारखे.
आपण आहोत सार्वभौम
अंतराळासारखे.
आपल्याच मनाचे मालक
आपण,
अंकित नाही कुणाचेही.
आपणही आहोत निसर्गसुत
आपण आपले स्वातंत्र्य
घेऊन आलो आहोत दुनियेत.
आपले जन्मदत्त स्वातंत्र्य
चिरडण्याचे स्वातंत्र्य नाही कुणालाही.
आपणच आहोत
आपल्या स्वातंत्र्याचे शिल्पकार.
आपल्या स्वातंत्र्यावर नाही
मालकी कोणाचीही.
अशी मालकी मान्य केली आपण
की ती असते हत्या
आपली आपणच केलेली.

८. बंधो!
आपल्यातही असतो एक
तेजोनिधी.
तो विझवू देऊ नये
कोणालाही.
आपण जपले
आणि वृद्धिंगत केले
आपले तेजोनिधीपण
तर अंधाराची हिंमत होत नाही
आपल्या वाटेत आडवे येण्याची.
हे तेजोनिधीपण
असते मार्गदर्शक तत्त्वांसारखे
संविधानातील.
आपल्यातला तेजोनिधीच देतो
आपल्याला शब्द,
देतो पंख शब्दांना
स्वातंत्र्याच्या देशात जाण्याचे.
त्वचेसकट
आपल्यावरच्या गळून पडतात खोळी
आपण होतो आदिम.
आपण होतो धर्म आणि जात
नसलेले पाणी.
होतो वारा सर्वसंचारी
जाति, धर्म आणि वर्गविहीन.

अंतरिक्ष होतो
जात, धर्म नसलेले.
हे होत नाही,
त्यांचे माणूसपणच उगवत नाही
पृथ्वीच्या पाठीवर.

९. बंधो!
उगवता सूर्य आपल्याला
बघता आणि वाचता यावा.
आपल्यातल्या तेजोनिधीने
त्याच्यासोबत करावी चर्चा
आज अस्तित्वात नसलेल्या
उजेडाची.
जो उगवतो हस्तक्षेपाच्या
सौंदर्यातून.
पसरत जातो सर्वांच्याच
मुळांना स्वातंत्र्याची पोषणद्रव्ये
देत.
म्हणून झाडे आपल्याच
अस्तित्वाची बेरीज फुलवित
राहतात.
आपणही झाडे होऊ शकलो
तर आपल्यालाही येते नवी पालवी.
मोरपिसारे येतात आपल्याला
नवनवे.
आपल्याला ऐकता येते मग
नक्षत्रांची परस्परात चालणारी चर्चा.
चर्चा चंद्र आणि सूर्य यांच्यात होणारी
आणि फुलत जाते
आदिम माणूसपण,
आपल्या बुंध्यावर
स्वातंत्र्याच्या अजिंक्य इच्छांनी.
आपली इच्छा होते मग
प्रकाशासारखी सर्वव्यापी.
प्रत्येकाच्याच आयुष्यावर
संपूर्ण चांदणे ओतणाऱ्या
चंद्रासारखी.

१०. बंधो!
आपण आपल्या माणूसजन्माचा
करायला हवा अपार सन्मान.
वाटावा त्याचा अपार अभिमान.
जपावी त्याची गरिमा.
होऊ नये कोणापुढे लाचार,
आपल्या माणूसपणाचे जगात
कशानेही होत नाही मोल.
माणूसपण ठेवू नये आपले गहाण
पैशांच्या आणि सत्तांच्या
डोंगरांकडे.
असे झाले की
सहजच आपण होतो पशू, होऊन जातो प्रेत.
होऊन जातो केवळ कलेवर
ज्याची पात्रता असते
केवळ चितेत जळण्याची वा
जमिनीत दफन होण्याची.
स्वाभिमानाची हत्या
इतरांकडून होवो वा
स्वतःकडून होवो
ती असते माणूस असण्याचीच
हत्या.
मी कोणाचा गुलामही नाही
आणि कोणाचा मालकही नाही
असे मानणारे परिपूर्ण
माणूसपण
प्रकाशित करतो,
अशा पूर्ण माणसांचे सर्जन
हेच अख्ख्या जीवनाचे आणि
बुद्धीच्या धडपडीचेही ध्येय आहे.

११. बंधो!
आपणच कॅप्टन असायला हवे
आपल्या आयुष्याच्या जहाजाचे.
सर्वांचा स्वाभिमान तोच
माझा स्वाभिमान,
होणार नाही अपहरण
आपल्या स्वाभिमानाचे,
होणार नाही चोरी
स्वातंत्र्य नावाच्या आपल्या
निसर्गदत्त दौलतीची.
आपल्या माणूसपणाला
लागणार नाही ग्रहण कणभरही
याची प्राणापेक्षाही
काळजी घेतली पाहिजे आपण.
माणूस म्हणजे
सत्त्व मानवी जीवनाचे.
स्वातंत्र्य म्हणजे
परम अर्थ मानवी जीवनाचा.
गडगंज संपत्तीवाले
आणि सत्तांचे डोंगर
खिशात वागविणारेही केवळ
निरर्थक ठरतात
याच सत्त्वाविना आणि
स्वातंत्र्याविना.

१२. बंधो!
मानवी सत्त्वाची
रचना करणारांना
जगू देत नाहीत सत्ता.
सत्ता जाळतात त्यांना
सडवतात तुरुंगात
ढकलतात उपेक्षेत,
करतात हत्या.
स्वतःचे माणूस म्हणून
निर्माण करणे वा
इतरांच्या माणूसपणाच्या
निर्मितीचे प्रकल्प राबविणे
स्वयंघोषित मालकांना
वाटते अनैतिक.
ही वाटतात त्यांना
सत्तेविरुद्धची कारस्थाने.
स्वातंत्र्याच्या निर्मात्यांना
आणि मानवी सत्त्वाच्या
शिल्पकारांना ठरवले जाते
गुन्हेगार.
आणि या गुन्हेगारांना
घडविली जाते अद्दल.
स्वातंत्र्य हा शब्दही उच्चारण्याची
होणार नाही हिंमत,
मानवी सत्त्वाची करताही
येणार नाही कल्पना
असा तयार करण्यात येतो
मोसम.
तरी माणूस निर्मिण्याची,
त्याच्या परिपूर्णतेच्या निर्मितीची
तहान नष्ट नाही करता आली
माणसाची कोणालाही.
माणूस होऊ इच्छिणारी माणसे
संपली नाहीत कधीही,
माणूसपणाचे साकल्य
निर्माण करणारांचे उत्तराधिकारी
निर्माण होतातच वळणावळणावर
जीवनाच्या.
मानवी जीवनाचा हाच
संघर्षशील इतिहास
गौरव करावा असा इतिहास आहे

१३. बंधो!

आपले माणूसपण तेजस्वी
करण्यासाठी धडपडणारे
आपले पूर्वज लढताना कोसळले
पण मानवी सत्त्वाचे निशाण
त्यांनी पडू दिले नाही
हातातले.
पुढल्या हातांनी झेलले लगेच
आधीच्या हातातील निशाण.
हे आपले पूर्वज
हातपाय तोडले तेव्हा
पंखांनी उडत राहिले
माणुसकीच्या झगमगत्या
गगनात.
पंख कापले सत्तांनी त्यांचे
त्यावेळी डोक्यांनी उडत राहिले
ते माणसाला परिपूर्ण करणाऱ्या
दिशेच्या रोखाने.
आपण या निष्ठांची,
या मानवी परिपूर्णतेच्या
शिल्पकारांची संतान आहोत.
जिद्द आपली जीवनशैली आहे,
मर्यादांवर सतत मात करणाऱ्या
सर्जनशील मानवी बुद्धीची
अफाट श्रीमंती आहे
आपल्याजवळ.
म्हणून आपण थांबत नाही
कुठेही.
अपयशाला मानतो आपण
अर्धविराम, स्वल्पविराम.
आणि पूर्णविरामाच्या दिशेने
उड्डाणे घेत राहतो,
आपल्या प्रयत्नांच्या मर्यादांना
मानवी बुद्धिमत्तेच्या
मानीत नाही आपण मर्यादा.
आपला इतिहास मर्यादांवर
मात करण्याचाच
गौरवशाली इतिहास आहे.

१४. बंधो!
सत्तेच्या डोळ्याला डोळा भिडवताना
लटपटतात ते पाय
स्वातंत्र्याचे नसतात,
सत्तेपुढे घोळतात गोंडा
ती अस्तित्वे जिवंत माणसांची
नसतात.
सत्तेच्या पायापायात घोटाळतात
त्यांना श्वान म्हणतात.
पैशांच्या पुढे थिरकतात
त्यांना हुजरे म्हणतात.
सत्तेच्या दारात झोळ्या होतात
त्यांना भिकारी म्हणतात.
मान वर करीत नाहीत
त्यांना मेंढरे म्हणतात.
आपल्याच स्वाभिमानाचे प्रेत
खांद्यावर वागवतात भक्तिभावाने
त्यांना गुलाम म्हणतात.
मानेचा अर्थ वर पाहणारा
दृढविश्वास हाच असतो.
कण्याचा अर्थ
ताठ असणे असाच असतो.
माणूस या शब्दाचा अर्थ
स्वाभिमान
आणि सत्त्वाचा अर्थ
बाणेदारपणा हाच असतो.
या मानवी सौंदर्याचा हात सुटणे
म्हणजे स्वतःला मृत्यूच्या हवाली करणेच
असते.

१५. बंधो!

समजावून घ्यावेत सत्तांचे मनसुबे.
स्वातंत्र्य या शब्दाचा
सत्तेचा अर्थ वेगळा असतो
आपला अर्थ वेगळा असतो.
आपल्याला अंकित, गुलाम
करणारे पद्धतीशास्त्र लक्षात घ्यावे.
आपले हरणे आणि उदास होणे
हवेच असते सत्तेला.
आपण हस्तक्षेप न करणे,
आपण प्रश्न न विचारणे,
आपण ओंडके होणे
पुरात वाहणारे,
आपण जिवंत न होणे
हे सर्व हवेच असते सत्तेला.
पण सत्तेची गुर्मी
उतरवणारे प्रश्न व्हायला
हवे आपण.
आपण स्वातंत्र्याची रोपे
व्हायला हवे पोलादी.
सत्तेने आपणा सर्वांनाच
दुःखाच्या कढईत
तळले आहे.
सत्तेने आपणा सर्वांनाच
अन्यायाच्या वणव्यात
जाळले आहे.
आपण एकमूठ झालो
तर दुनियेची दिशा बदलू शकतो.
आपण आपल्या स्वातंत्र्याची
दुनिया निर्माण करू शकतो.
जिथे जमीन आपली,
अंतरिक्ष आपले,
चंद्रसूर्य आपले
आणि आपले माणूसपणही
आपले आणि स्वतंत्र असेल.
अशी वेळ निर्माण करू आपण
ज्यावेळी दुनियेत शोषण
हा शब्द अस्तित्वात नसेल
विषमता हा शब्द
अस्तित्वात नसेल
आणि अमानुषता हा
शब्दही दुनियेत नसेल.
असेल फक्त
स्वातंत्र्य स्वातंत्र्यासोबत
अधिकाधिक समृद्ध होणारे.
माणसे दिसतील परस्परांना
स्वातंत्र्यासारखी.
परस्परांमुळे येणाऱ्या
नव्या पालवीची चर्चा
करतील लोक गर्वाने.
सत्य भेटावे सत्याला,
उजेड भेटावा उजेडाला
कळवळा भेटावा कळवळ्याला
तशी भेटतील माणसे परस्परांना .
मी आदिही माणूसच आहे
आणि अंतीही माणूसच आहे
मी मावत नाही माझ्यातही,
कोणा भाषेतही, सीमांमध्येही
आणि जातीधर्मांच्या चौकटीतही
मावत नाही मी कोणत्या.
प्रत्येकच माणसात गदगदून येईल अंतरिक्ष
आणि त्याच्या ओठांवर
हीच कविता असेल साकल्याची!
धुरे आणि कुंपणे नसलेल्या
माणुसकीची!

**यशवंत**
**मनोहर**
नागपूर

## ...नैराश्य

निराशेची पुटं चढलीय
संबंधाच्या उरल्या सांगाड्यावर
कितीही दूर सरायचं म्हंटलं तरी
उपटून फेकताच येत नाहीये
करपलेली रोपटी मनातून...
मनाचं माळरान झालंय
उजाड माळरानावरलं वाळलं गवत
कधीकाळी किती लुसलुशीत होतं
त्या आठवणी रुतताहेत काळजात
अन काळजाच पाणी पाणी होतं...
पाण्याचं डबकं साचलंय
त्यातले गैरसमजाचे किडे डसताहेत
जखमांमधून वहातय रक्त
समजदारी, स्वीकारार्हतेची मलमपट्टी
निवळतच नाहीत जखमा...
जखम ठसठसतेय
किती काळ उलटून गेला तरी
साकळली म्हंटलं तरी व्रण आहेच
आठवणींचा कोलाहल आत खोलवर
आणि निराशेची पुटं चढतच जातात...

**अस्मिता**
**गुरव**
जळगाव

त्या वृक्षाच्या तळी
अंथरूण माझी गोधडी
उसवावीत टाके मी
माझ्याच कपाळावरची
अन् या सृष्टीने दृष्टी लाभून
मज युगे दिसावी दूरची
निश्चल एकचित्त
बसून जरा निवांत
वादळाच्या विनाशाचे
मी हिशोब मांडून पहावे
अन् वाचलेल्या लेकरांना माझ्या
मन भरून कुरवाळावे
सुकलीच पानं फूटतात
साऱ्या माझ्या झाडांना
वारसा उन्हाचा
पिढ्यान्पिढ्यांचा
मग मी सूर्यवंशी बनतो खरा
भेगाळल्या भूईची
ओळख जूनीच हृदयी
आज लिंपीतो दुःखांना
अन् अभंग होत जातो

**गजेंद्र**
**भोसले**
शेळगाव (जि.परभणी)

## खरेय न?

सहज म्हणून फिरायला गेलो
तर हे मोटरसायकल वरून आले
रथातून आले
रणगाड्यातून आले
जेसीबी घेऊन आले ते

ते तालिबानच्या शुष्क वाळवंटातून आले
रक्तामांसाचा चिखल तुडवित आले
तुळया सीमेंट काँक्रिटच्या ढासळणाऱ्या ढिगाऱ्यावरून आले
जुन्या जीर्ण धर्मग्रंथांच्या फडफडत्या पानातून अवतीर्ण झाले

म्हणाले, खबरदार.
मुक्त फिरतोस, निर्भयपणे?
मी फक्त कटीवरचे युगे अठ्ठावीस घट्ट झालेले दुखरे हात काढले
त्यांनी चापावरची बोटे घट्ट केली
मी वाकलो
त्यांना वाटले मी नमलो
हरलो
मी खाली वाकून माझ्या पायाखालची एक वीट हातात घेतली
ते म्हणाले, चप्पल दाखवतोस?
हिंसा करतोस?
मी विटेवर बोटांनी काही लिहिले
ते भ्याले
म्हणाले, आमच्या विरुद्ध विचार लिहितोस?
की ..
मंत्र तंत्र करतोस?
आणि त्यांनी विटांच्या ठिकऱ्या उडवल्या..
माझ्याही.

मग खूप वेळ शांतता होती.
एकेक ठिकरी शांतपणे पुढे सरकत राहिली
पुन्हा त्यांच्याही ठिकऱ्या
आता माझ्या सोबत अठरा अक्षौहिणी ठिकऱ्यांचे नि:शस्त्र सैन्य होते
निर्भयपणे मॉर्निंग वॉक करणारे
सारे पुंडलीकच
माझा धूळ भरला फुटका निश्चेष्ट चष्मा
हे जे काय पाहातोय
ते खरे आहे ना?

**मोहन**
**देस**
पुणे

नव्या कवितेत
गाडग्या मडक्यातले दुःख
गाभण राहिल्याची गोष्ट
मी येऊ देणार नाही
माझ्या नव्या कवितेत
हिंदुस्थान लिव्हरच्या जाममधून
रक्त बाजूला करणारी
असेल माझ्या कवितेची
पहिली ओळ
चढू देणार नाही तिला मी
श्लोकांची भूल
पिझ्यासोबत जेव्हा शेवटचा
स्वातंत्र्य संग्राम करण्याची वेळ येईल
तेव्हा माझी कविता
भाकरीच्या बाजूने
पहिला जीव देईल
माझी कविता
सापडणार नाही विद्यापीठात
पुलांखाली राहणाऱ्या लोकांनी
ती मळून ठेवली आहे पिठात
मासेवाल्या बायांनी तिला
स्वच्छ केली आहे खवले काढून
मेळघाटात मेलेल्या मुलांनी
ती सोबत नेली आहे वाढून
मरणामातीच्या श्रमाने आणि

भाकरीच्या भ्रमाने
लाल झालेल्या शब्दांचे डोळे
मी छापू देणार नाही पुस्तकात
कारण मातीत सापडलेलं
प्रश्नांचं उत्तर मला
टांगायचं नाही आभाळात
अभ्यासकांनो
कवितेच्या गुप्तांगावर चर्चा करा
तिच्या उपजाऊ असण्या नसण्यावर
सेमिनार भरवा
पाना फुलांनो, चांदण्यांनो
तुम्ही काढा मोर्चे
गर्दी करा
माझ्या कवितेला कधीच मिळालंय
वंचितांच्या वेणांचं आरक्षण
समीक्षकांच्या कात्रीने सीझर करून
मला कापून घ्यायचा नाही
माझ्या कवितेचा गर्भ
माणसांशी नाळ तोडून
मला बदलून घ्यायचे नाहीत
काळजाचे संदर्भ

**भरत**
**दौंडकर**
मलठणफाटा, जि.पुणे

## गौरी लंकेश...टू बी कंटिन्यूड...

तुझ्या देहावर झाडलेल्या बुलेटस
आमच्या अंतर्मनाला भेदत नाही,
आम्ही अफूच्या नशेत आहोत अर्ध-निद्रिस्त.

या ब्राम्हो-भांडवली ॲनेस्थेशियाने
आमचे डेमोक्रॅटिक सेन्सेस झाले आहेत नम्ब
आम्ही मास; पण आम्हाला नाही मांस .
आम्ही आहोत सापळे,
डी जे च्या तालावर झुमणाऱ्या झोम्बिझ ...

तुझी डेथ हा एक ऑसम इश्यू आहे गं,
रागाचे इमोटिकॉन्स, जीफिझ;
ठेवायला एक नॉव्हेल डी.पी.,
काही क्यांडल्स, तोंडावर ब्ल्याक रीबंझ

तू काळजी करू नकोस
आम्ही प्राईम-टाईममध्ये आमचे उर बडवू ,
तुझ्यासारख्या काही अद्याप हयात असणाऱ्यांचा
बी पी वाढवायचाय.
कमर्शियल ब्रेकसह हा इश्यू कंटिन्यू राहील ....

तुझ्या अभिव्यक्ती विचार आचारांपेक्षा
तुझा मृतदेह आम्ही व्हायरल केला..
बैकग्राऊंडला
तुझ्या रक्ताच्या थारोळ्यातून
डोकावणारी भारतमाता तेवढी
आऊट और फोकस असेल

नेक्स्ट शूट-आउटपर्यंत ...
सफदर हाशमी ते छत्रपती,
दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी
नंतर हा तुझा एपिसोड ..
एक्सट्रीमली हाय क्रिटिक एण्ड पॉप्युलॅरीटी रेटींग!

तुझ्या देहावर झाडलेल्या बुलेटस आमच्या
अंतर्मनाला भेदत नाही,
आम्ही अफूच्या नशेत आहोत निद्रिस्त.

**विनय**
**सोनुले**
अमरावती

**कवितेची पानं**

# इथे लिहिण्याची किंमत मोजावी लागते

गौरी लंकेश
माफ कर मला
तुला मारलं
अन् ते म्हणाले
एक कुतिया मर गई!
मी म्हणाले
माणूस मारता येतो
विचार नाही मारता येत...
लेखणीचा खून होताना
लोकशाहीचा चौथा स्तंभ
कोसळताना
मी शाब्दिक निषेधाशिवाय
काहीच केलं नाही
करू शकत नाही
रान पेटवावं
एवढी राहिली नाही ताकत
कवितेमध्ये
रक्त झालंय थंड
विझून गेलेत शब्द
राख पसरलीय संवेदनांवर
धुकं दाटलंय डोळ्यात
'अच्छे दिनांचं'...
अन् कातडी वाचवून
लिहायचा जडलाय रोग...
तुझ्यामुळे मिळालाय मला
कवितेचा विषय
तशी
तूही झालीसच की
बातमीचा विषय
एका दिवसापुरता
बघ
एवढी प्रसिद्धी
कुठे कुणाला मिळते?
आता रंगतील चर्चा कट्ट्यावर
तुझ्याबद्दल मोघम माहिती असणारेही
बोलतील पोटतिडकीने
अग्रलेखांनी सजतील रकाने
वा कदाचित
झाकोळूनही जाशील तू
बाबा रामरहिमच्या
जंतरमंतरमध्ये
धर्माच्या ठेकेदारांपुढे
नादान बाईच तू
तुला प्रायॉरिटी कशी देता येईल प्राईमटाईममध्ये
गौरी
तू बाई होतीस
अन् भीत नव्हतीस
हा तुझा केवढा मोठा गुन्हा....
तू हिंदूही नव्हतीस या हिंदूराष्ट्रात
अन् मानत नव्हतीस जात पात
छे...बाईने असं कुठं वागायचं असतं का समाजात
ढोर गवार शुद्र पशू नारी,
सब ताडण के आधिकारी
हे वाचलं नव्हतस का बये?
का कलबुर्गीचा इतिहास
माहीत नव्हता तुला...
बाई असूनही स्वतंत्र विचार
करता येत होता तुला.
नक्षलवाद्यांच्या चळवळीला
कुठं समजून घ्यायचं असतं का?
पत्रकार असलं म्हणून काय झालं
इथे मोदींचा आंधळा भक्त व्हावं लागतं
अन् महंतांचा आशिर्वादही घ्यावा लागतो
भगव्यांना वाकून झुकून सलाम करावा लागतो

प्रकाशन दिनांक १-१०-२०१७

संघाला डावलून कसं जगता येईल बये
बुद्धी गहाण ठेवावी लागते
लेखणीची धार बोथट करावी लागते
सत्ताधाऱ्यांचे तळवे चाटावे लागतात
विचार करणारी
विचार पेरणारी
माणसं मारली जातात इथे
बाईपेक्षाही गाय
पवित्र मानली जाते इथे
फेकन्युजवाल्यांची शाळा भरती इथे
गोमांस सापडल्याच्या संशयावरून
माणसं जाळली जातात इथे
देशभक्तीच्या व्याख्या बदलल्या जातात इथे
हिंदू -मुस्लिम द्वेष पोसला जातो इथे
इथे बातम्या घडविल्या जातात
बघ ना
देशाची संरक्षणमंत्री झालीय एक बाई
विधिवत पूजाअर्चा करून बसलीय खुर्चीत
अन् त्यात ही तुझी हत्या....
इथे पोपट पाळले जातात
अन् बोलणारे टिपले जातात
हे कळत नव्हतं का तुला?
मीडिया विकला गेलाय
अन् अँकर झालेत चमचे....
जगण्याची दहशत वाटावी
इतका छान गोंडस
बुरखा पांघरलाय हुकूमशहाने
लोकशाहीत.
मुखवट्यांच्या जगात
शिणून गेलेय मी
माणसाचा चेहरा शोधता शोधता
मला वाटतंय
मी प्रेत झालेय
चालतं....बोलतं.....
गोळीच्या प्रतिक्षेत असलेलं.
गौरी लंकेश
शंकेस वाव असतानाही
गुमनाम असतात मारेकरी
फिरतात उजळ माथ्याने
हातात लिस्ट घेवून
आपण वाट बघायची फक्त
आपला नंबर येण्याची
घरच्यांना द्यायचा खोटा धीर
पण सांगायचं स्वतःला
आतल्या आत बजावून
इथे लिहिण्याची किंमत
मोजावी लागते...

**संध्या**
**रंगारी**
नांदेड

## सूर्यफूल

कधी या जमावाकडे पाहून
हिरमुसल्यावाणी होऊन हसणं
कधी त्या जमावाकडे पाहून
हिरमुसल्यावाणी होऊन हसणं
कधी फुलता फुलता स्वतःच
फुलणं थांबवणं
कधी झुलता झुलता स्वतःच
झुलणं थांबवणं
सूर्यफुलाच्या वाट्याला
हे काय आलंय जगणं...

**विलास**
**वैद्य**
हिंगोली

## कोळी किडा

कोळी मटकावू शकत नाही वाघ आणि सिंह
म्हणून आपल्या भोवताली जाळं विणून
किडा खात बसतो मच्छर आणि माशा

कोळी आख्या आसमंतातल्या देवांना करत असतो
आवाहन
वाघ सिंह हरणं बकऱ्या हत्ती माणसासहीत सर्व प्राणी
व्हावेत
अनुक्रमे नसली तरी मच्छर माशा डास गोमाशा पाकळ्या
पतंग
जे सहज जाळ्यात अडकून मटकावता येतील घशात

सोयीचा वारा सुटला की कोळी म्हणतो 'माझ्यामुळेच'
जाळीत अडकताच किटकाला आधी उपदेशतो
'माझ्या कारणे देह तुझा का पडावा'चे तत्त्वज्ञान
आणि सावकाश गलितगात्र मटकवताना पटवून देतो
'माझ्यामुळेच तुला आता मोक्षाचे दार!'

**सुधीर**
**देवरे**
सटाणा जि. नाशिक

## नव्या सुगंधाचे फूल

एक अनामिक
ऋतू उगवून आलाय
रोज नव्या पडझडीचा

उभे आयुष्य एका झाडाच्या
सावलीत काढलेय
एकाकी झाड निष्पर्ण झालंय
आणि घरटे उघडे पडलेय

जो तो येतोय
आणि चिमण्या पाखरांचे
काय झालेय म्हणून विचारतोय

मी कसे सांगू त्यांना की,
पाखरं मोठी झालीत आणि
नव्या घरट्यात रमलीयत म्हणून

आता हे झाड
आणि घरटे दोघेही दु:खात
चिंब भिजली आहेत
एक दिवस थांबेन
हा वेदनेच्या झडीचा पाऊसही

परवाच एका बहराशी
माझे बोलणे झालेय...
तडजोडीचे अंकुर फुटले आहेत
निष्पर्ण फांदीवर...
पुन्हा नवी पाने येतील
आणि रूपच बदलून
जाईल जगण्याचे

प्रतिक्षेचे क्षण
संपतातच एकना एक दिवस
तू आहेस कोठे...
मला द्यायचेय तुला
माझ्या काळजाच्या फांदीवर
उगवलेले नव्या सुंगधाचे फूल

**शशिकांत**
**हिंगोणेकर**
लातूर

# देव्हारा

देव्हारा विकणे आहे
देवासकट
हवाय का?
काय...?
किती देव आहेत?
अर्थात्
तेहेतीस कोटी
हवं तर मोजून घ्या
कमी नाही भरणार एकही
कदाचित जास्तच.

ते तुमचं घर
संतती, समृद्धी
व संपत्तीने भरतील,
आनंदीआनंद
तुमच्या जीवनात
आणतीलच
याची गॅरंटी मात्र नाही
वॉरंटीही नाही.

वर्ष, सहा महिने,
तीन महिने,
तीन दिवस?
शाश्वती नाही
नो...!

देव्हारा विकत घेतल्यावर
कदाचित लगेच
तुमची नोकरी जाऊ शकेल
तुमचा ॲक्सिडेंट होऊ शकेल
भयंकर
किंवा
तुमच्याविषयी गैरसमज
राग
तुमच्या जवळच्यांच्या मनात
किंवा
तुमची लॉटरीही लागू शकेल
धंद्यात, प्रेमात, राजकारणात
असंच तत्सम काहीही
बरं...वाईट
त्याला
देव, देव्हारा किंवा मी
जबाबदार असणार नाही.

तसा प्रत्येकालाच
मिळतो एक देव्हारा
जन्मजात
तांब्या-पितळेचा
सोन्या-चांदीचा
लाकडी-शिसमाचा
दगडी-संगमरवरी
अजान, क्रूसाचा
भाकरी अन् भूकेचा.

अपरिहार्यतेच्या हौसेने
विकत घेणारे खूप
खूपच
पण विकता येणंही महत्त्वाचं
नाही का?

मानवतेच्या गच्च मिठीत

तुझी कौम, तुझा मजहब
तुझा धर्म, तुझा अल्लाह
तुझी नमाज, तुझी दुवा
सगळं, सगळं
माझंच ए की,
किती काळापासून

माझ्या आत भिनलेलं
माझ्या आत रुजलेलं
माझ्यातूनच उगवणारं

तुझा सेहऱ्यातला चेहरा
तुझे सुरम्यातले डोळे
देह अत्तराची कुपी
अन् श्वासांचे सोहळे

मानवतेच्या गच्च मिठीत
विसावतं आपलं प्रेम
ईश्वरासारखं तरल
जेव्हा,
तुझे दाढीतले ओठ
अलगद उमटतात
माझ्या कपाळावर
कुंकवासारखे.

**सारिका**
**उबाळे परळकर**
अमरावती

दिव्यांच्या पिवळ्या उजेडात
मी वळून पाहिली
गर्दीत हरवलेली माणसं

गर्दीत हरवलेली माणसं हसत होती
अन् जाता जाता खात होती
देवळाच्या मागून एकजण डोकावत होता
समोरच्या रस्त्यावर थुंकला माझ्याकडे बघून

दिव्यांच्या वर आकाश नव्हते
खाली रस्ता सरळ वाहणारा
पुढे वळून
शहराच्या आत दूर जात असलेला
अंधारातले रस्ते कसे दिवसाउजेडीही
समोर येतात. शहरभर फिरत राहतात
त्यांच्यावरची माणसं खऱ्या माणसांसारखीच
लगबगीने घरी जात असतात
पण रस्ते चुकल्यावर ती मोठ्याने हसतात
आणि नजरानजर झाल्यावर रागाने बघतात

**राहुल**
**पुंगलिया**
पुणे

## तुमचं बाई!

कसं हो मॅडम ॲडव्होकेट?
'घराला बेडरूम नाही म्हणता'
तरीही, देवानं पदरात टाकलीच तीन लेकरं
जगाला घाबरत नाही.
'घरात फक्त
नवऱ्याला'
किती धाडस तुमचं
हे जगजाहीर?
ठेवतो बाई विश्वास आम्ही
तुमच्या धावत्या बैलबंडीवर!
चाळीस वर्षात सोनाराचं दुकान पाहिलं नाही कधी
असं म्हणता बाप्पा,
असेलही खरं
तुमची शपथ
तुमचं खरं. सगळं जगजाहीर खरं.
-पण, हा माझा वांड नवरा..हा..हो
म्हणतो मला,
'शीक, शीक जरा..
रेटून बोलायला
दाबून बोलायला
माझं माझं ओवाळायला
गावोगावी
आळवायला
समोरच्यांना भोवळायला..'
मी विचारलं, 'आणि खोटंही का मग?'
त्यावर त्याचं
नुसतं दात वेंगाडणं.
मॅडम! तुमचं बाई...

**मेघना**
**वाहोकार**
सावनेर जि. नागपूर

## गावऱ्हाटी

कशा हवे वेशीवर
उगी तोरणाचे भार
ऋजुपण नाही गावा
नारू कारू खाती मार

परतीच्या पावलांनी
दिंडी जाते पंढरीला

शिव्या ओव्या गावा ओठी
गुऱ्हाळच एरंडाला

वेशी आत कोंडवाडा
वेटाळून नाग नक्षी
गावऱ्हाटी राखणीला
विटाळाचे रान पक्षी

गावठाणी वाऱ्यावर
पागोट्याचा उडे शेला
माळरानी चरणाऱ्या
शेळ्यापाठी लागे कोल्हा

पिढीजात जळमटे
कुणी फिरवेना झाडू
मंदिरात मूर्तीवर
सदा उपडाच गडू

धुळीमध्ये रेघोट्याच्या
अक्षरांनी दिल्या हाळ्या
पांढरीच्या कपाळाव
तिरकस दिसे वळ्या

उडवळी धुळ ज्याने
बाटवली गावऱ्हाटी
मढे त्याचे कुणी नेले
कोरड्याशा ओढ्याकाठी

**साईनाथ**
**पाचारणे**
भोर, जि.पुणे

## चर्चा करतो आहे

बापानं हातातलं पुस्तक कधी सोडू दिलं नाही
अन् हातात रुमणं कधी धरू दिलं नाही
बाप गाळायचा दिवसरात्र घाम
पिकवायचा शेती
दिवस कोणतेही असो बाप फाटक्यातच असायचा.

बाप वाचायचा कालचा पेपर आज
बांधावर बसून तो चिडायचा
अन् चिडल्यावर माती फेकायचा
चिमणी पाखरांच्या दिशेनं
कणसातली काही दाणे वाचविण्यासाठी

सांजवेळी विचारायचा अभ्यासाबद्दल
तेव्हा मी सारं काही सांगायचो
अशीच वर्ष निघून गेलीत
तो राबत राहिला
मी शिकत राहिलो
तो विचारत राहिला
मी सांगत राहिलो
आता तो राबतो आहे
अन् मी चौकातल्या टपरीवर बसून
चर्चा करतो आहे.

**गणेश**
**भाकरे**
सावनेर जि.नागपूर


प्रकाशन दिनांक १-१०-२०१७

## दगड

चौकात गेलो
पुतळ्यासमोर उभा राहिलो
अन् त्याच्यासमोर पोटतिडकीनं मांडल्या
माझ्या व्यथा... वेदना आणि दुःख
तर
चौकातला पुतळा तसूभरही हालला नाही
किंवा एक चकार शब्दही बोलला नाही माझ्याशी

मग मी देवळात गेलो
देवासमोर उभा राहिलो
अन् त्याच्यासमोरही पोटतिडकीनं मांडल्या
माझ्या व्यथा... वेदना आणि दुःख
तर
गाभाऱ्यातला देव सुद्धा तसूभरही हालला नाही
किंवा एक चकार शब्दही बोलला नाही माझ्याशी

आता मी मोठ्या आशेनं तुमच्याकडे आलोय
अन् तुमच्यासमोर पोटतिडकीनं मांडतोय
माझ्या व्यथा... वेदना आणि दुःख
तर वातानुकुलित दिवाणखान्यात बसलेले तुम्ही
तसूभरही हालत नाही
किंवा एक चकार शब्दही बोलत नाही माझ्याशी

भीती वाटतेय
चौकातल्या पुतळ्यासारखा
किंवा
देवळातल्या मूर्तीसारखा
तुमच्यातल्या कनवाळू माणसाचाही
दगड झालाय की काय?

**प्रशांत**
**असनारे**
अकोला

## आमी आभाळाकडं बघत जगतो...

आमी आभाळाकडं बघत जगतो
रणरण उन्हात राबराब राबतो
काळ्या ठिकार अंगावरती
उन्हाला झेलून उद्याचं सपान बघतो...

येणार भरून आणि
जाईल पाणी पाणी करून
पायांच्या भेगाना चिखलाचा
मलम लावीन म्हणतो, वाट त्याचीच बघतो
अन् आमी आभाळाकडं बघत जगतो...

टोपल्यात झाकल्याली भाकर
आठवून काळ्या ढगाकडं बघतो
हुलकावनी दिली त्यानं तर पुन्हा वाट पाहतो
अन् आमी आभाळाकडं बघत जगतो...

कालच्या शिडकाव्यानं
दबून बसलाय धुरळा अन्
न कोसळणाऱ्या ढगागत दाटलंय
उरात काळंभोर आभाळ..
कोसळाव ते म्हणून उरात आग चेतवतो..
अन् आमी आभाळाकडं बघत जगतो...

**हणमंत**
**पडवळ**
उपळे (मा.) जि. उस्मानाबाद

## आयर्न लेडी

इरोम,
आयर्न लेडी
पोलादी निश्चयाची सोळा वर्षे
सिद्ध केलास
बापूने दिलेला वसा
उपोषण आणि सत्याग्रह
आहे किती प्रभावी

तू बसलीस उपोषणाला
तेव्हा उमटले अनेक प्रश्न
काय होणाराय उपोषणाने?
देशाच्या एका कोपऱ्यात
एक सुकोमल तरुणी
काय बदलू शकते व्यवस्था?

आफ्स्पा केवळ निमित्तमात्र
तुझ्या कृतीनं उधळून लावलीस
दमनकारी हिंसक व्यवस्था
निरपराध मारले जाणारे नागरिक
बेपत्ता होणारे तरुण
स्त्रियांवरील बलात्कार
आख्खं मणिपूर धगधगत असताना
तू शांतीच्या मार्गाने उभारला लढा
तुझ्या अवतीभवती गावोगावी
उभ्या राहिल्या 'इमा'
हातात नग्न मशाली घेऊन
तू पेरलेल्या चळवळीनं
उगवल्या सळसळत्या 'मैरा पैबी'
आत्मविश्वासानं ओतप्रोत

व्यवस्था हतबल
तुला जिवंत ठेवण्यासाठी
नाकातोंडात नळ्या
सोळा वर्षात कणाकणानं
देह क्षीण झाला तरीही
वाकू दिला नाहीस कणा

आज तू उपोषण घेतेय मागे
पुन्हा उमटतायत अनेक प्रश्न
काय मिळवलंस? काय साध्य?
तुला देवत्व बहाल केलेल्यांना तर
मान्य नाहीय तुझा निर्णय
त्यांना झालीय सवय इरोम
कोणत्याही लढ्याला
जयपराजयाच्या तराजूत तोलण्याची
तुझ्या सोळा वर्षांच्या यशाचा
ते बांधू शकणार नाहीत अंदाज

दगडी व्यवस्थेवर
किती काळ आपटायचं डोकं
व्यवस्थेला सुरुंग लावण्याचा
नवीन मार्ग शोधला पाहिजे इरोम

मी करते स्वागत!
उपोषण सोडण्याच्या तुझ्या निर्णयाचं
तुझ्या माणूस म्हणून जगण्याचं..

**पद्मरेखा**
**धनकर**
चंद्रपूर

टीप :
आफ्स्पा : सैन्याचा विशेषाधिकार कायदा
इमा : मणिपुरी मातांची संघटना
मैरा पैबी : मणिपुरी लढाऊ स्त्रिया

## जाईल संपत्ती

सांद पाहुनिया हळूच शिरणे
काबिज जगणे दुसऱ्याचे

दुःखाचा कुणाच्या घेऊन आसरा
स्थापला देव्हारा आपलाच

भकभक पोट वारंवार क्षती
धन हातोहाती पांगणारे

जाईल संपत्ती देह नासवून
दुःखाची ठेवून फट ओली

एकांत गिळील लुचतील माशा
छळतील आशा जगण्याला

**तुकाराम**
**खिल्लारे**
परभणी

## सभा आणि नेता

हजारो लोकांच्या साक्षीने
भरसभेत खोटं बोलणाऱ्या
नेत्या इतकाच खरा असतो
समोरच्या गर्दीचा चेहरा
लोक ऐकत असतात आवाज नेत्याचा
आणि नेता बोलत असतो
लोकांच्या मनातले
तो कळू देत नाही
डाव्या मनातले उजव्या मनाला
करतो ज्या त्या वेळी जे ते
जे केलेले त्यालाही नंतर आठवत नसते
त्याने घेतलेल्या शपथविधी प्रमाणे
नेता करत असतो, करत राहतो
त्यालाच हवे ते
नेता बोलत असतो, बोलत राहतो
लोकांना हवे ते
स्वप्ने, आशा, आश्वासने
कधीही न येणाऱ्या त्या दिवसांसाठी
वाढीला लावत असतो
लोकांचे तग धरून जगणे
मोफत घरे, मोफत शिक्षण
स्वस्त धान्य, अनेक योजना
न बरेच काही
नेता बोलत असतो कळवळून
त्या सुखांच्या क्षणांसाठी
लाळ वाहत राहते गर्दीतून
पोहोचते नेत्यापर्यंत
जिवंत होतो नेत्याआतला माणूस
वाहात राहतो लाळेतून
लोक तरंगत राहतात
सभेत ललकारणाऱ्या नेत्याच्या बुलंद घोषणांत
लोक घरंगळतात नेत्याच्या वचनात
नेता आरसा होतो हळूहळू
लोक पाहतात त्यात स्वतःला
लोक माफ करतात त्याला
लोक माफ करतात स्वतःला

**मंदाकिनी**
**पाटील**
बदलापूर, जि. ठाणे

## अलिकडे

अलिकडे मी कुठेच सापडत नाही
ना माझ्या हक्काच्या हक्काबक्काच्या घरात
ना कोणत्या चौकट निसटलेल्या दारात,
ना हाटात ना घाटात
ना मापाच्या ना बिनमापाच्या बुटात
ना आत्मकेंद्री सच्च्यात ना झुट्यात
अलिकडे कुठेच सापडत नाही मी
ना असतो मी घरातल्या आरामहराम खुर्चीवर
बूड मांडून शून्यात हरवलेला
ना असतो वर्तमानविन्मुख वर्तमानपत्रांच्या ढिगात
ना वाचनालय, की वचनालय तेथे
ना चर्चेत पर्चे फडकावत हिशेबी चर्चासत्रात
ना आंदोलनात ना मोर्च्यात
ना धरण्यात ना चक्काजामात
मी सापडत नाही घामातही कोणाच्या
अलिकडे मी कुठेच सापडत नाही
तुझ्यात, त्यांच्यात तर नाहीच नाही माझ्यातही नाही
माझ्या असण्याची अख्खी सुकून गेली सर्वरंगी शाई
मी सापडत नाही म्हणजे तुम्ही शोधावं असं नाही
मी सापडत नाही प्रश्नाला खो द्यावं असंही नाही
तरी डोळे विस्फारत बरळलं कोणीसं अस्फुटसं
तो दिसला मला काल
संसदेच्या गदारोळात मार खाताना
जायबंदी अर्धमेला झालेला मागच्या बाकावर
शून्य तासात अखेरचे श्‍वास मोजताना...
कदाचित ती अफवाही असेल

**प्रमोदकुमार**
**अणेराव**
भंडारा

## गाव रिता बघताना

कुठे गेले हंगामाच्या सुगीचे दिवस
राबणाऱ्या माणसाला घडला उपास।।

भूई तुझ्या उदरात पेरले सपन
उगवून वर आले आकंठ मरण
लढ म्हणून मनाला पलटतो कुस।।

उन्ह पावसाच्या फंदी भरडली पात
भूईभेग सांधताना करपले हात
सुई मनाची करून शिवतो उरास।।

दूरदेशी पाखरांनी थाटले संसार
पोटासाठी नाकारले हिरवे माहेर
गाव रिता बघताना झुरतो कापूस।।

काळजाच्या ऋतूसंगे चालतो संगर
आठवांची धुळमाती जगण्या आधार
खोल खोल जखमांनी शिवार भकास।।

**किशोर**
**कवठे**
बामणवाडा, जि.चंद्रपूर

## बळी

मित्रांनो!
बोकडाचा बळी देऊन जसं
शुभ कार्य केलं जातं
तसाच माझा बळी घेऊन
तुमचा विकास केला जाणार आहे
मित्रांनो,
माझ्या शेतातून, गावातून

मुंबई-नागपूर एक्सप्रेस वे जाणार आहे
इथंच स्मार्ट सिटी, ग्रीनपार्क, टेक्नॉलॉजी पार्क
हे सारं होणार आहे
अन् यात माजी जन्मोजन्मीची भाकर
माझा आसरा हिसकावून घेतला जाणार आहे...!

माझ्या गळ्यावून
सुरा आता फिरणार आहे
मित्रांनो, तुमचा विकास
नक्की होणार आहे.

**राहुल**
**पाटील**
शेलगाव राऊत, जि.बुलडाणा

## तुझ्या गंधाच्या ओढीनं

जगातल्या उष्ण प्रदेशात
तुझं वास्तव्य
तुझ्या गंधाच्या ओढीनं
स्पार्कवर आरूढ होऊन
विजेच्या गतीनं धावतं देहमन
जुमानत नाही
कोणत्याच टोलनाक्याला
ठहरतच नाही
ब्रेकवर पाय
स्पीडब्रेकर ठरताहेत कुचकामी
रस्त्यावर एक्स रे बनून
लेनचा मुडदा पाडत
फिरताहेत डोळे
आताशा
मी माझ्यात नाही
मी आपल्यात नाहीच

**भूषण**
**रामटेके**
वर्धा

## दुःख मिळाले

दुःख मिळाले, आणखी मिळू दे, दुःखाचे दुःख नाही,
दुःख याचे की माणसाच्या जगात माणूस भेटत नाही।।
आकाश कोसळले, आणखी कोसळू दे, पण...
आपल्यासाठी कुणाचा अश्रू ढळत नाही, सोसवत नाही।।
जळले मी, आणखी जळू दे, जाईल माझी राखही..
राखेला हसतात माझेच लोक हे पाहवत नाही।।
दिले मी सर्व, आणखी देईन, जे माझ्यात आहे काही,
आयुष्य अर्पुनी सारे माणूस मला सापडत नाही।।

**निर्मला**
**माने**
पुणे

## मरण

संताप पायातला
डोक्यात येतो
तळव्याकडे
हात जातो.
डाव्या हातावर
पान तुळशीचे
मरण फरशीचे
सदाकाळ.
नको तिथे पडे
श्रमाचे दान
सोन्याचे पान
देवाघरी.

**महावीर**
**जोंधळे**
पुणे